मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

# विनायकराव पाटील महाविद्यालय वैजापूर

## STRIDE-COPONENT-1

## <u>फुले, शाहू, आंबेडकर व्याखानमाला</u>

## २६, २७, २८ एप्रिल २०२२

## अहवाल

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विनायकराव पाटील महाविद्यालय वैजापूर आणि विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत STRIDE-COPONENT-1 यांच्या संयुक्त विद्यमाने तीनदिवसीय फुले, शाहू, आंबेडकर व्याख्यानमाला दि २६, २७, २८ एप्रिल २०२२ रोजी महविद्यालयाच्या स्वामी विवेकानंद सभागृहामध्ये संपन्न झाली. या व्याख्यानमालेसाठी उद्घाटक आणि प्रमुख व्याख्याते म्हणून महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत प्रा. रावसाहेब कसबे, मराठीतील कादंबरीकार व समीक्षक प्रा. डॉ. रवींद्र ठाकूर, महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. हरी नरके ही मान्यवर व्यक्ती लाभलेली होती. या व्याख्यानमालेसाठी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. प्रकाश दादा सोळुंके, सरचिटणीस मा. श्री. सतीशभाऊ चव्हाण, महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख मा. श्री. आप्पासाहेब पाटील यांनी प्रोत्साहन दिले. या व्याख्यानमालेचे उद्घाटन प्रा. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते झाले. अध्यक्ष म्हणून महाविद्यालय विकास समिती सदस्य मा. श्री. विजय भाऊ ठोंबरे होते. या व्याख्यानमालेचे संयोजन मराठी विभाग प्रमुख डॉ. महेश खरात यांनी केले होते.

दि २६ एप्रिल रोजी व्याख्यानमालेचे पहिले पुष्प **प्रा. रावसाहेब कसबे** यांनी गुंफले. **'सद्यःस्थिती व फुले शाहू आंबेडकरांच्या विचारांची प्रासंगिकता`** या विषयाच्या संदर्भाने त्यांनी अभ्यासपूर्ण भाष्य केले. ते म्हणाले की, आधुनिक भारताचे खरे जनक महात्मा ज्योतिबा फुले यांनी जगात सर्वप्रथम धर्माची चिकित्सा केली म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फुले यांना गुरू मानले. ज्योतिबा फुले

यांनी जुने सर्व ग्रंथ नाकारले व पर्यायी व्यवस्था म्हणून आधुनिक तत्त्व, विचार व संस्कृती समाजाला प्रदान केली. या जगतातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर एकच महापुरुष की ज्यांनी भारतातील महिलांना मतदानाचा हक्क मिळवून दिला त्यांनी विदेशातील अनेक देशांची दाखले दिले ज्यांनी महिलांना तुच्छ लेखून मतदान अधिकार दिले नाही किंवा स्त्री पुरुष समानता देण्यात खूप उशीर केला. विश्वनिर्मिती बाबत त्यांनी स्पष्ट केले की, विश्व निर्मितीचे प्रमुख केंद्र ईश्वर नसून मानव आहे. बाबासाहेब आंबेडकर हे जगाला फार उशिरा कळाले. 70 वर्षानंतर संपूर्ण जगाने बाबासाहेबांची जयंती साजरी करण्यास प्रारंभ केला. युनोने ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी करण्यास प्रारंभ केला आहे. बाबासाहेबांचे सर्वसमावेशक विचार समजून घेतल्याशिवाय तरणोपाय नाही असेही ते म्हणाले. यावेळी विचारपिठावर महाविद्यालय विकास समिती सदस्य श्रीमती आनंदीताई अन्नदाते, महाविद्यालय विकास समिती सदस्य मा. श्री. निलेश भाटीया, माजी प्राचार्य जाधव सर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी थोरे उपस्थित होते. या व्याख्यानमालेचे प्रास्ताविक संयोजक व मराठी विभाग प्रमुख डॉ. महेश खरात यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. ज्ञानेश्वर खिल्लारी यांनी करून दिला. सत्राचे सूत्रसंचालन प्रा. बाळासाहेब गायके यांनी केले तर आभार प्रा. राजेश कोळेकर यांनी मानले.

दि २७ एप्रिल रोजी व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प मराठीतील कादंबरीकार व समीक्षक **प्रा. डॉ. रवींद्र ठाकूर** यांनी गुंफले. **'महात्मा फुले यांचा वैचारिक वारसा`** या विषयावर अभ्यासपूर्ण भाष्य केले ते म्हणाले, महात्मा ज्योतिबा फुले यांचे कार्य म्हणजे विशाल महासागर होय. त्यांनी सदैव संपूर्ण मानव जातीच्या कल्याणाचा सकारात्मक विचार केला व त्याप्रमाणे साहित्य, कृतीत उतरविले. वेद म्हणजे भेद होय म्हणूनच तर महात्मा ज्योतिबा फुले यांनी वेदांचे तत्व नाकारले, आज देशात अत्यंत भयावह स्थिती आहे. धर्माच्या नावाखाली फूट पाडण्याचे जे षड्यंत्र चालू आहे, त्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. आज फुले यांच्या साहित्याचा जागर करण्याची नितांत गरज आहे नसता आधीपासूनच भरडत आलेली जनता अशीच पुढे

भरडत राहणार. या सत्राचे अध्यक्ष महाविद्यालय विकास समिती सदस्य मा. प्रमोद दादा जगताप होते. यावेळी विचारपिठावर महाविद्यालय विकास समिती प्रमुख, कृषीभूषण मा. श्री. आप्पासाहेब पाटील, महाविद्यालय विकास समिती सदस्य श्रीमती आनंदीताई अन्नदाते, माजी प्राचार्य जाधव सर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी थोरे, व्याख्यानमालेचे संयोजक व मराठी विभाग प्रमुख डॉ. महेश खरात उपस्थित होते. पाहुण्यांचा परिचय प्रा. बाळासाहेब गायके यांनी करून दिला. या सत्राचे सूत्रसंचालन प्रा. राजेश कोळेकर यांनी केले तर आभार प्रा. बाळासाहेब गायके यांनी मानले.

व्याख्यानमालेसाठी उपप्राचार्य डॉ संदीप परदेशी, उपप्राचार्य डॉ दादासाहेब साळुंखे, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, वैजापूर शहरातील रसिक श्रोते, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या व्याख्यानमालेचे आयोजन मराठी विभाग प्रमुख डॉ महेश खरात यांनी केले होते, संयोजनांमध्ये डॉ ललित अधाने, डॉ ज्ञानेश्वर खिल्लारी, प्रा बाळासाहेब गायके, प्रा राजेश कोळेकर, प्रा गणेश पवार यांनी सहकार्य केले.

## * सत्र तिसरे *

**दि.२८ एप्रिल, २०२२ सकाळी : ११.३०**

व्याख्याते : मा.प्रा.हरी नरके, जेष्ठ विचारवंत पुणे
विषय : सावित्री ज्योती : नव्या प्रकाशात
अध्यक्ष : ॲड. देवदत्त पवार, सदस्य, महाविद्यालय विकास समिती

## * मार्गदर्शक *



मा.प्रकाश सोळुंके
अध्यक्ष, म.शि.प्र.मंडळ औरंगाबाद



मा.सतीश चव्हाण
सरचिटणीस, म.शि.प्र.मंडळ, औरंगाबाद



मा.आप्पासाहेब पाटील
प्रमुख, म.वि.समिती

## * विनीत *

डॉ. शिवाजी थोरे
प्राचार्य

डॉ.डी.एस.साळुंके
उपप्राचार्य

डॉ.एस.डी.परदेशी
उपप्राचार्य व स्ट्राईड समन्वयक

डॉ महेश खरात
संयोजक व मराठी विभाग प्रमुख

## * संयोजन समिती *

प्रा.डॉ.ललित अधाने, डॉ.ज्ञानेश्वर खिल्लारी, प्रा.बाळासाहेब गायके

प्रा.राजेश कोळेकर, प्रा.गणेश पवार

---

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित

# विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर

Scheme for Trans-Disciplinary Research for India's Developing Economy'
(STRIDE)



# फुले, शाहू, आंबेडकर व्याख्यानमाला

दिनांक : २६, २७ व २८ एप्रिल, २०२२
वेळ : सकाळी ११.३०



प्रा.रावसाहेब कसबे
जेष्ठ विचारवंत
नाशिक



प्रा.डॉ.रवींद्र ठाकूर
कादंबरीकार व समीक्षक
कोल्हापूर



प्रा.डॉ.हरी नरके
जेष्ठ विचारवंत
पुणे

**कार्यक्रमाचे स्थळ**
स्वामी विवेकानंद सभागृह, विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर
दूरध्वनी : ०२४३६-२२२०८६, ई.मेल.vpcvaijapur@gmail.com

---

# उद्घाटन

**दि.२६ एप्रिल, २०२२ सकाळी : ११.३०**

**उद्घाटक व व्याख्याते**

प्रा.रावसाहेब कसबे
(जेष्ठ विचारवंत, नाशिक)

**विषय**

सद्यःस्थिती व फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांची प्रासंगिकता

**अध्यक्ष**

मा.आप्पासाहेब पाटील
(प्रमुख, महाविद्यालय विकास समिती)

**विशेष उपस्थिती**

मा.विजय ठोंबरे,
(सदस्य, महाविद्यालय विकास समिती)

---

## * सत्र दुसरे *

**दि.२७ एप्रिल, २०२२ सकाळी : ११.३०**

*** व्याख्याते ***

प्रा.डॉ.रवींद्र ठाकूर
(कादंबरीकार व समीक्षक, कोल्हापूर)

*** विषय ***

महात्मा फुले यांचा वैचारीक वारसा

*** अध्यक्ष ***

ॲड. प्रमोद दादा जगताप
(सदस्य, महाविद्यालय विकास समिती)






फुले,शाहू,आंबेडकर व्याख्यानमाला
मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर, जि.औरंगाबाद
स्वामी विवेकानंद सभागृह


मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर, जि. औरंगाबाद
स्वामी विवेकानंद सभागृह


मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर
Scheme for Trans-Disciplinary Research for India's Developing Economy (STRIDE)
फुले, शाहू, आंबेडकर व्याख्यानमाला
वेळ : सकाळी ११.३० वा.
२७ एप्रिल २०२२
विषय
महात्मा फुले यांचा वैचारिक वारसा
व्याख्याते
मा.प्रा.डॉ. रवींद्र ठाकूर
कादंबरीकार व समीक्षक, कोल्हापूर
२८ एप्रिल २०२२
विषय
व्याख्याते
मा.प्रा.डॉ. हरी नरके
ज्येष्ठ विचारवंत, पुणे
विनीत
डॉ. शिवाजी थोरे
प्राचार्य


विनायकराव पाटील महाविद्यालय,वैजापूर
फुले,शाहू, आंबेडकर व्याख्यानमाला
मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर, जि.औरंगाबाद
स्वामी विवेकानंद सभागृह


विनायकराव पाटील महाविद्यालय,वैजापूर
फुले,शाहू, आंबेडकर व्याख्यानमाला
मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर, जि.औरंगाबाद
स्वामी विवेकानंद सभागृह


मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
पाटील महाविद्यालय, वैजापूर, जि.औरंगाबाद
स्वामी विवेकानंद सभागृह







